अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे शहर.
मध्यवर्ती इमारत, ससून रुग्णालय जवळ, पुणे ४११ ००१
संपर्क क्र.: ०२०-२६११९६००

जाक्र.अपोआ/उप्रावि/झेरॉक्स मशीन/वा.दे.दु.करार/ ५९८१ /२०२० पुणे, दि ०५/११/२०२०

**विषय** : फोटोकॉपीअर/झेरॉक्स मशीन / मल्टिफंक्शन मशीन (हेव्ही ड्युटी) चे वार्षिक देखभाल दुरूस्ती करार करणेबाबत.

-----००००० -----

अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे शहर कार्यालयातील तसेच अखत्यारीतील पोलीस उप-आयुक्त / सहायक पोलीस आयुक्त कार्यालय व पोलीस स्टेशन्स कडील खालीलप्रमाणे नमूद उपलब्ध फोटोकॉपीअर/झेरॉक्स मशीन / मल्टिफंक्शन मशीन (हेव्ही ड्युटी) चा वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार करावयाचा आहे.

| अ.क्र. | झेरॉक्स मशीन/मल्टिफंक्शन प्रिंटर कंपनीचे नाव | मॉडेल क्रमांक |
|---|---|---|
| १. | कॅनॉन | इमेज रनर २४२२एल |
| २. | सॅमसंग | के२२००एनडी |
| ३. | शार्प मल्टिफंक्शन प्रिंटर | ऐआर६०२० |
| ४. | तोषिबा | ई स्टुडियो १६१ |

**वार्षिक देखभाल व दुरूस्ती कराराकरीता अटी -**

१. मल्टीफंक्शनल प्रिंटर्स व झेरॉक्स मशिन्सच्या देखभाल/दुरुस्तीसाठी कराराकरीता सादर करण्यात येणाऱ्या दरांमधेच सर्व मशिन्सची वर्षभर देखभाल व दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.
२. कार्यालय / पोलीस स्टेशनकडून नादुरुस्त मशीनच्या दुरुस्तीकरीता कॉलच्या संख्येची मर्यादा राहणार नाही. दुरुस्ती कॉल ज्या दिवशी केला असेल त्याच दिवशी अथवा कार्यालयीन कामकाजाच्या दुस-या दिवशी कार्यालयीन वेळेत आपलेकडील हार्डवेअर इंजिनीअर पाठवून दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.
३. महिन्यातून कमीत कमी एकदा व जरूर पडल्यास संबंधीत कार्यालय / पोस्टेकडून भ्रमणध्वनीवरून संपर्क करताच केव्हाही कोणत्याही वेळी नमूद सर्व ठिकाणी सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

तरी उपरोक्त नमूद अटी मान्य असलेल्या इच्छुक कंत्राटदारांनी नमूद मशीन्सचे वार्षिक देखभाल व दुरूस्ती कराराकरीता-

**अ) झेरॉक्स/मल्टि.मशीन दुरूस्ती सेवा स्पेअर पार्ट व्यतिरीक्त**
**ब) झेरॉक्स/मल्टि.मशीन दुरूस्ती सेवा स्पेअर पार्टसह**
**क) झेरॉक्स/मल्टि.मशीन स्पेअर पार्ट (अधिकृत कंपनीचे नावांसह)**

**सविस्तर दर सीलबंद लिफाफ्यात इकडील कार्यालयास दि.१०/११/२०२० रोजी १२.०० वाजेपर्यंत पर्यंत सादर करावीत.**

५/११

(नामदेव चव्हाण)
अपर पोलीस आयुक्त
उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे शहर

प्रति,

पोलीस निरीक्षक, संगणक शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- उपरोक्त जाहिरात पुणे पोलीस संकेतस्थळावर दि.१०/११/२०२० पर्यंत प्रसिद्ध करण्यात यावी.

Scanned with CamScanner